# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २६/३/२००८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/३/२००८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—५

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक २६/३/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

२. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४४ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४५ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४६ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५० | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५१ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५४ | श्री. किशोर जग्यासी |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५५ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६० | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६१ | श्री. मोहन साधवाणी |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६५ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३० | श्री. लाल पंजाबी | ६६ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६७ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६८ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ६९ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७० | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३५ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७१ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३६ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७२ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३७ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७३ | श्री. प्रकाश गणपत सावंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्री.एडके गणपत गोविंद | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती जया प्रकाश माखीजा, २. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ३. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, ४. श्रीमती सुमन गजानन शेळके, ५. श्रीमती लता शांताराम निकम, ६. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, ७. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, ८. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. जी. टी जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१०. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
११. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
१२. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१३. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१४. श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलन

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** दि. १.४.०८ पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

---

**महापालिका सचिव :–**सन्माननिय सदस्या श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांनी मा. महापौरांना सूचना दिली आहे की, मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी विहित नमुन्यातील फॉर्म त्यांच्याकडे भरुन दिले होते त्यावेळी तीन अपक्ष सदस्यांचा एक गट तयार करण्यात आला होता. त्यामध्ये श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, श्रीमती ज्योती चैनानी व श्री. हिरो केवलरामानी यांचा समावेश होता. त्यानंतर श्री. हिरो केवलरामानी यांनी राजीनामा दिल्याने दोन सदस्यांचा गट अस्तित्वात आहे. त्यामुळे मा. महापौरांच्या वतीने श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांना अपक्ष गटनेता म्हणुन घोषित केले जात आहे.

स्थायी समितीच्या ८ सन्माननिय सदस्यांची येथे घोषणा करण्यात येणार आहे. वेगवेगळया पक्षांकडुन जी नावे सुचविण्यात आलेली आहेत ती याप्रमाणे आहेत.

१. **शिवसेनेच्या वतीने**––दोन नावे सुचविण्यात आली आहेत. १) श्री. रामसागर जनार्दन यादव
२) श्री. प्रधान धर्माजी पाटील
२. **राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने** –– दोन नावे सुचविण्यात आली आहेत. १) श्री. गणपत गोविंद एडके
२) श्री. राजु किशनचंद जग्यासी
३. **कॉंग्रेस पक्षाच्या वतीने** –– एक नाव सुचविण्यात आलेले आहे.१) श्री. मोहन साधवानी

महापालिका सचिव:—राष्ट्रवादी कॉंगेस पार्टीच्या वतीने श्री. जीवन इदनानी...... माफ करा, माफ करा..... लोकभारतीच्या वतीने.....

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:— अभिनंदन आहे, अभिनंदन आहे?

महापालिका सचिव :—४. **लोकभारती पक्षाच्या वतीने**——दोन नावे सुचविण्यात आली आहेत.
१) श्री. जीवन इदनानी
२) श्री. मोहन रामरख्यानी

५. **भारतीय जनता पार्टीच्या वतीने**——एक नाव सुचविण्यात आले आहे. १) श्री. हरेश जग्यासी

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—गटनेता नेमणुकीबाबत विभागीय आयुक्त, कोकण भवन यांच्याकडुन जे पत्र आले आहे ते वाचुन दाखवाल काय? त्यामध्ये आणखी काही सदस्यांची नावे असतील ना? कुणा कुणाची नावे आहेत? वाचुन दाखविण्यामध्ये काय हरकत आहे?

महापालिका सचिव :—सर्व पक्षांनी आपापल्या संख्याबळानुसार विभागीय आयुक्त कोकण भवन यांच्याकडे विहित नमुन्यातील फॉर्म भरुन दिला होता त्यामध्ये तीन अपक्ष सदस्यांच्या गटानेही फॉर्म भरुन दिला होता. त्यामध्ये गटनेत्याच्या रकान्यामध्ये श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांचे नाव लिहिले होते. व आरपीआय गवई गटाच्या फॉर्ममध्ये श्री. प्रशांत धांडे यांचे नाव गटनेत्याच्या रकान्यामध्ये लिहिलेले आहे. याचबरोबर इतर जे पक्ष आहेत त्यांच्या गटनेत्यांची नावे आपणांस माहित आहेतच.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आणखी एक नाव आहे आपण हे का सांगत नाही? आपण अर्धीच माहिती देत आहात?

महापालिका सचिव :—आपणाकडे पत्र असेल तर मी खात्री करुन घेतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ते नाव सांगण्यामध्ये आपले काय जाते? ते पत्र वाचुन तर दाखवा ना?

महापालिका सचिव :— ठिक आहे मी फाईल मागवतो.

सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:— जे काही मिळायचे असेल ते सर्वांना मिळाले पाहिजे ना?

महापालिका सचिव :—अगोदर जी तीन नावे आपणांस सांगितली त्यानंतर श्रीमती मंजु ईश्वर पोपटानी यांचा एक स्वतंत्र फॉर्म असुन त्या फॉर्म मध्ये गटनेता म्हणुन त्यांचेच नाव आहे. त्याचबरोबर तीन अपक्ष सदस्यांमध्ये गटनेता म्हणुन श्रीमती निलम रावत यांचे नाव यापुर्वी जसे सांगीतले त्याप्रमाणे अपक्षांचा गटनेता म्हणुन त्यांचे नाव आहे. तसेच आरपीआय (गवई) गटाचे गटनेते म्हणुन श्री. प्रशांत धांडे व मनसेचे गटनेते म्हणुन श्री. नरेंद्र वामन दवणे यांचे नाव असल्याचे यापुर्वीच मी आपणांस सांगितले आहे. त्याच प्रमाणे दुसरे एक अपक्ष श्री. मुकेश सोहन तेजी यांचेही गटनेताच्या रकान्यामध्ये गटनेता म्हणुन नाव लिहिलेले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सर्व गटनेत्यांची गटनेता म्हणुन घोषणा झाली पाहिजे ना? दालन वगैरे जे काही मिळायचे असेल ते सर्वांना मिळाले पाहिजे ना? दालन तर मिळेल. दालनासाठीच ही सर्व खटपट आहे.

महापालिका सचिव :—श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांची गटनेता म्हणुन नेमणुकीची घोषणा करण्याचे मा. महापौरांच्या वतीने आताआताच जी मान्यता देण्यात आली होती, त्याबाबत सर्वांशी चर्चा केल्यानंतर मा. महापौरांनी आता असा निर्णय घेतला आहे की, त्यांनी या अगोदर त्यांनी दिलेल्या निर्णयास त्या स्थगिती देत आहेत कारण की याबाबत आता काही शंका निर्माण झाल्या आहेत. म्हणुन मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याशी सल्लामसलत करुन त्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, कोकण भवन येथुन गटनेत्याच्या नेमणुकीबाबतचे पत्र आलेले आहे. त्यानुसार गटनेत्याच्या नावाची घोषणा केली नाही तर आपणांस कायदेशीर नोटिस पाठविली

जाईल.  याबाबीकडे आपण जरा लक्ष दयावे.  याबाबतीत आम्ही विभागीय आयुक्त कोकण भवन यांच्या कार्यालयात चौकशी करुन आलो आहोत. त्यांनी आम्हांला असे सांगितले आहे की, गटनेता नेमणुकीची घोषणा करणे हे महापालिका संचिवांचे, महानगरपालिकेचे काम आहे. ते जर असे करत नसतील तर आम्ही त्यांना कायदेशीर नोटिस बजावु शकतो.  असे आम्ही तेथे विचारुन आल्यानंतर आपणांस पत्र दिले आहे.एक वर्ष झाले आपण गटनेत्यांच्या नेमणुकीची घोषणा केली नाही. गटनेता नेमणुकीचे पत्र देवुन एक वर्ष झाले तरी अदयाप आपण गटनेता नेमणुकीची घोषणा करत नाहीत. यासाठी आपणावर केस करावी लागेल. यासाठी आम्ही लोक किंवा सभागृह जबाबदार नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>माफ करा, आपण जसे म्हणत आहात की, महापालिका सचिव व महापौरांचे हे काम आहे. प्रत्यक्षात आम्हां दोघांचेही हे काम नाही.  येथे कित्येक वर्षापासुन प्रथा पडत आली आहे त्यानुसार मा. महापौर घोषणा करतात.  नियमामध्ये असे आहे की, फक्त आपणांस विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे सूचना दयायची आहे.  त्यांच्याकडुन पत्र आल्यानंतर आपल्या नावास मान्यता मिळते किंवा न मिळते त्याबाबत महासभेने कोणताही निर्णय घ्यायचा नाही.  परंतु येथे जी प्रथा पडली आहे त्या प्रथेनुसार सर्व गटनेत्यांच्या नेमणुकीची पत्र मा. महापौरांकडे सादर केली जातात.  आणि त्यानंतर त्यांच्याकडुन त्यां नावाची घोषणा केली जाते. परंतु कायदयानुसार आपण मला किंवा मा. महापौरांना जबाबदार धरवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>कायदयानुसार गटनेत्याची विभागीय आयुक्त यांनी घोषणा केली आहे.  त्यास जर आपण मान्यता देत नसाल तर ते आपणावर अवलंबुन आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>आम्ही मान्यता देण्याचा काही आवश्यकताच नाही, कुणाच्याही नावासाठी, एकदा का आपण विभागीय आयुक्तांकडे फॉर्म भरुन दिला की त्याबाबतचा मुद्दा संपृष्टात येतो.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>ठिक आहे, ठिक आहे..

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे......

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय :–** दि. १.४.०८ पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका २००७ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२००७ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तीची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षाने पोट कलम ३ अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील. त्यांच्या नियुक्तीच्या तारखे पुर्वी स्थायी समितीचे सभापती ठरवतील अशा वेळी व रितीने चिठ्ठया टाकुन ठरविण्यांत येते.

त्याअर्थी चिठ्ठया काढण्यासाठी दि. ७.३.२००८ रोजी सभा बोलविण्यांत आली होती सदर सभेत काढण्यांत आलेल्या चिठठयांअंती स्थायी समिती ठराव क्र.१५७ दिनांक ७.३.०८ अन्वये  निवृत्त झालेल्या  ८ सदस्यांची नावे खालील प्रमाणे आहेत

१ श्री. सुपाळे विजय खंडु

२ श्री. इदनानी जीवन (राजु) चंद्रभान

३ श्रीमती निकम लता शांताराम

४ श्री. गायकवाड दिलीप दशरथ

५ श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल

६ श्री. पारवानी राम (चार्ली) फुदुंमल

७ श्रीमती रावत निलम प्रेमसिंग

८ श्रीमती उदासी इंदिरा जमनादास

सदरच्या सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे आवश्यक असल्याने पुढील प्रमाणेचा प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित.

सन—२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७६ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. महापालिकेच्या स्थायी समितीतून दिनाक १.४.०८ पासुन निवृत्त होण—या ८ सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | १२ | ६ | ५ | २ | १ |

| | |
|---|---|
| ७६ / ०८ | = ९.५ |

स्थायी समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ९.५० असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७ —— X ८ ७६ | =१.७८ | (५) | कॉंग्रेस | ६ —— X ८ ७६ | = ०.६३ |
| (२) | शिवसेना | १७ —— X ८ ७६ | = १.७८ | (६) | आरपीआय | ५ —— X ८ ७६ | = ०.५२ |
| (३) | रा.का.पा. | १६ —— X ८ ७६ | = १.६८ | (७) | म.न.से. | २ ——X ८ ७६ | = ०.२१ |
| (४) | भाजपा | १२ —— X ८ ७६ | = १.२६ | (८) | अपक्ष | १ —— X ८ ७६ | = ०.१० |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | १ | — | — | ४ |

यानंतर रिक्त राहणा—या चार जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.७८ (२) शिवसेना ०.७८ (३) म.न.से ०.२१

(४) रा.का.पा. ०.७८ (५) भा.ज.पा. ०.२६ (६) कॉंग्रेस ०.६३

(७) आरपीआय ०.५२ (८) अपक्ष ०.१०

वरील परिस्थिती पहाता **लोकभारती, शिवसेना, राष्टवादी कॉंग्रेस व कॉंगेस** या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे **चार** रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे स्थायी समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | — | — | ०८ |

## विशेष महासभा ठराव क्र. ७२ दिनांक :— २६/३/२००८

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील आठ सदस्यांचे स्थायी समितीवर नेमणुक करीत आहे.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी
२. श्री. मोहन रामरख्यानी
3- श्री. मोहन साधवानी
४. श्री. हरेश परमानंद जग्यासी
५. श्री. रामसागर जनार्दन यादव
६. श्री. प्रधान धर्माजी पाटील
७. श्री. गणपत गोविंद एडके
८. श्री. राजु किशनचंद जग्यासी


इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सर्वानुमते मंजुर

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.



जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.०५ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२९/३/२००८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००८ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—६

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक २९/३/२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप—महापौर, श्री. चव्हाण रमेश महादेव हे उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

३. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३१ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३३ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३४ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३५ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३६ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३७ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३८ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ३९ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४० | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४१ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४५ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १७ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १८ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४७ | श्रीमती लता शांताराम निकम |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ४८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ४९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २१ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५० | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्री. लाल पंजाबी | ५१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५३ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २५ | श्रीमती शकुंतला पाटील | ५४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ५७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्री.एडके गणपत गोविंद | ५८ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. महापौर–– श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण, २.श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ३. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ४. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ५. श्री. राजू जग्यासी, ६. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ७. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ९. श्री. भठीजा (बब्बु) संजय, १०. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, ११. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, १२. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १३. श्रीमती सुमन गजानन शेळके, १४. श्री. किशोर जग्यासी, १५. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, १६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १७. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), १८. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १९. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, २०. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, २१. श्री. राजेश नानीकराम वधारीया, २२. श्री. बोडारे धनंजय बाबूराव

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१ श्री अशोक बागेश्वर, उप आयुक्त (मुख्यालय)
२ श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३ डॉ. दिपक सावंत, उप–आयुक्त
४ श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
५ श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६ श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७ श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी १२.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. महापौर श्रीमती लिलाबाई आशान हे अनुपस्थित असल्यामुळे श्री. रमेश चव्हाण, उप–महापौर हे महापौरांच्या स्थानी उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

**श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>मा. महापौरजी, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो. यापुर्वीच्या एक सभेत सुध्दा मी म्हटले होते की, महासभेमध्ये सर्व अधिकारी उपस्थित असले पाहिजे. परंतु खेदाने सांगावे लागत आहे की, आजच्या या महासभेत सुध्दा अधिकारी उपस्थित नाहीत. मला असे वाटते की महासभेमध्ये सर्व अधिकारी उपस्थित असले पाहिजेत. याबाबत मागील महासभेमध्ये मी जेव्हा ही बाब निदर्शनास आणुन दिली होती त्यावेळी मला असे आश्वासन देण्यात आले होते की, येणा–या महासभेत सर्व अधिकारी उपस्थित असतील. तर मग आज अधिकारी उपस्थित का नाहीत? हे मी आज आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ असलेल्या प्राधिकृत अधिकारी यांना विचारु इच्छित आहे.

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मागच्यावेळेसच सर्व अधिका–यांना महासभेत उपस्थित राहण्याविषयी आदेशित केले होते. आजच्या सभेत जर अधिकारी उपस्थित नसतील तर त्यांना कारणे दाखवा नोटिस बजावुन त्यांच्याकडुन खुलासा घेण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:—** उल्हासनगर शहरात दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत काही विकास कामांकरिता निधी मागणीचा प्रस्ताव मान्य करणे.

---

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—**सन्माननिय महापौरजी, तसेच सन्माननिय सर्व सदस्य, आयुक्त साहेब, याठिकाणी दलित वस्तीतुन कामे करण्यासाठी जो प्रस्ताव आणलेला आहे आणि त्यासाठी सर्वात प्रथम मी मा. महापौरांचे धन्यवाद मानतो. सर्व सदस्यांचे धन्यवाद मानतो. आणि आपली इच्छा व्यक्त करतो की आपण सर्वांनी एकमताने हा ठराव पारीत करुन हा प्रस्ताव लवकरात लवकर शासनाकडे पाठवावा. ३१ मार्चच्या अगोदर ही प्रकरणे आपणांस त्यांच्याकडे पाठवायचे आहेत. आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी सर्वांत जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करु या. ज्या नगरसेवकांच्या प्रभागातील कामांची प्राकलने या प्रस्तावामध्ये टाकली नसतील ती प्राकलने सुध्दा सामावुन घेण्यासाठी आपण याठिकाणी एक ठराव पारीत करु या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौरजी, याठिकाणी जी यादी देण्यात आलेली आहे, त्याबाबत सार्वजनिक बाधंकाम विभागाचा कोणी अभियंता येथे उपस्थित असेल तर मी त्यांना विनंती करतो की त्यांनी याबाबतची माहिती सभागृहास दयावी. कारण की ही कामे कोणत्या पध्दतीने होणार आहेत? कशाप्रकारे होणार आहेत व कधी पर्यंत होणार आहेत व दोन—दोन प्रकारच्या यादया का देण्यात आलेल्या आहेत? कृपया याबाबत थोडक्यात जरा माहिती दिली जावी. कारण की आम्हांला काही समजुन येत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**या अगोदर काही दलित वस्तीतील कामांचे प्रस्ताव मंजुर करुन ते शासनाकडे पाठविले आहेत तर त्याबाबतचा निधी महापालिकेस प्राप्त झाला आहे का? आला असेल तर तो वापरला आहे का? त्याबाबतची माहिती दिली तर या प्रस्तावावर पुढे चर्चा करणे अधिक सोयीस्कर होईल.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आजच्या या विशेष महासभेमध्ये दलित वस्तीतील विकास कामांकरीता निधी मागविण्याकरीताचा विषय आणलेला आहे त्याबाबत मला असे म्हणायचे आहे की, त्याबाबत देण्यांत आलेला हा जो गोषवारा देण्यात आला आहे, त्यामध्ये काय म्हटलेले आहे? त्याबाबतची माहिती देण्यासाठी शहर अभियंता यांना व्यासपीठावर बोलविण्यात यावे. सर्वात प्रथम मी गोषवारा वाचुन दाखवितो. शहर अभियंता यांना नेमके काय म्हणायचे आहे हे येथे नमुद केलेले नाही.

दलित वस्ती सुधार योजना सन २००७—०८ या आर्थिक वर्षात करावयाच्या विकास कामांचा प्रस्ताव सादर करणेबाबत. दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. विघयो—१०२००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि—४ दिनांक ५/३/२००२ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जातीच्या प्रभागामध्ये मुलभूत सोयी,सुविधांची कामे नगररचनाकार यांचे शिफारशीने मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची मान्यता घेऊन त्यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात येणा—या निधीमधून करणे आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर मध्ये ९ प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. तसेच २० दलित वस्त्यांना तत्कालीन नगररचनाकार यांनी मान्यता दिली आहे. सदर प्रभागांमधील दलित वस्तीतील कामांचे संबंधित नगरसेवकांनी सुचविलेली रु.५,२१,९८,३२०/— एवढया खर्चाचे विविध मुलभूत सोयींची सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' यादीप्रमाणे एकूण ५४ कामे प्रस्तावित आहेत. तथापी महानगरपालिकेच्या अन्य काही मा. नगरसेवकांनी त्यांचे प्रभागातील वस्त्यांमध्ये दलित वस्त्या असून तेथे अनुसूचित जातीच्या रहिवाशांची लोकसंख्या जास्त असल्याचे निदर्शनास आणून त्या वस्त्यांमध्ये कामांची मागणी केली आहे. नगरसेवकांनी सुचविल्याप्रमाणे केली आहे. सदर कामे परिशिष्ट 'ब' प्रमाणे आहेत. या कामांच्या ठिकाणी असलेल्या वस्त्यांमध्ये सर्वेक्षण करुन ज्या वस्त्यांमध्ये अनुसूचित जातीच्या रहिवाशांची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त होईल तेथे या योजनेअंतर्गत कामे हाती घेता येऊ शकतात.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी योजनेअंतर्गत रु. ५.०० कोटी इतकी तरतूद असल्याचे दिनांक २५/३/२००८ रोजीच्या पत्राद्वारे मा.श्री.प्रशांत धांडे, सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. शासन मार्गदर्शन तत्वांनुसार प्रस्तावित कामांना महासभेची मान्यता आवश्यक आहे. तसेच सदर कामांचे नकाशे नगररचनाकार यांचेकडून मान्य करुन घेणे आवश्यक आहे तसेच मागील निधीचे विनियोगिता प्रमाणपत्रही देणे आवश्यक राहिल. या सर्व कार्यवाहीस अवधी लागणार आहे. सद्यस्थितीत मार्च अखेर असल्याने आर्थिक वर्षाच्या समाप्तीपूर्वी मा.नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांना महासभेकडून मान्यता घेण्याकरीता प्रस्तावित आहे. परंतू सदर योजनेअंतर्गत कामे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्याच्या अनुसूचित जातीच्या वस्तींमध्येच घेण्याकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी त्याप्रमाणे अधिन राहुन परिशिष्ट 'अ'प्रमाणे ५ कोटी २१ लाख ९८ हजार ३२० खर्चाच्या ५४ कामांना महासभेची मान्यता मिळविणेस्तव व परिशिष्ट 'ब' प्रमाणे २ कोटी ५९ लाख ९९ हजार ९०० खर्चाच्या ३७ कामांबाबत महासभेच्या निर्णयास्तव ठेवणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

याबाबत मा. महापौरजी मला असे म्हणायचे आहे, काही नगरसेवकांनी सुचविल्याप्रमाणे, जेथे ५० टक्के दलित वस्ती आहे. हे नगरसेवकांनी सुचविले आहे. उदया जर एखादया नगरसेवकाने सुचविले की आमचे रामायण नगर किंवा अन्य कुठले एखादे नगर आहे तेथे ५० टक्के दलित वस्ती आहे. तर त्याबाबतचा निर्णय नगरसेवक घेवु शकतो का? नगरसेवक घेवु शकतो? दुसरी गोष्ट म्हणजे तत्कालीन नगररचनाकार यांनी सुचविलेल्या नगररचनाकार कोण होवु शकतो. असे जर नगररचनाकाराने ठरविले असते तर संपुर्ण उल्हासनगरमध्ये, श्री. धांडे, हे काय चालले आहे, आज सभागृह नेता आहेत, यांचे हे बरोबर नाही. आम्ही येथे बोलत आहोत आणि आपण येथे चर्चा करत आहात.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>बोला साहेब, बोला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>तुम्ही बसा मी बोलत आहे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की येथे नेमके काय म्हणायचे आहे. हे बरोबर नाही मी आज येथे हा गोषवारा का वाचुन दाखविला? शहर अभियंता यांना येथे बोलवा कारण की मराठीत शहर अभियंता यांना हा गोषवारा समजला आहे का? तसेच त्यांनी स्वाक्षरी केल्याप्रमाणे त्यांना हे माहित आहे काय? कारण असे म्हणतात की नगरसेवकांनी सुचविल्याप्रमाणे आणि काही ठिकाणी असे म्हणतात की जेथे ५० टक्के लोकवस्ती असेल तेथे ही कामे केली जातील. अशाप्रकारचा गोषवारा की ज्याने गोंधळ होत आहे असा गोषवारा येथे सादर केला आहे. तर मला असे म्हणायचे आहे की या गोषवाराप्रमाणे तेथे कामे होवु नयेत. समाजकल्याण येथुन एक पत्र आहे आहे ते मी दाखवेल की दलित वस्तीमध्ये जे प्रभाग येतात त्या प्रभागातच ही कामे झाली पाहिजेत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, श्री. शिर्के साहेब तुमच्या माहितीसाठी सांगत आहे. आपण सांगितले की १९९८ मध्ये श्री. चिजवानी हे शहर अभियंता होते त्यांनी जो सर्व्हे केला आहे, या सर्व्हेप्रमाणे जे १७ प्रभाग येतात ते दलित वस्तीप्रमाणे घ्यावेत असे तुमचे म्हणणे आहे आमचे म्हणणे नाही. मा. महापौरजी, दुसरा बोलला तर मी त्याला बाचेल, मी एकटाच काफी आहे बोलण्यास. हे बरोबर नाही, हे सभागृह आहे. सभागृहाची मर्यादा ठेवली पाहिजे. मला तरी असे वाटते की त्रिवेंद्रम येथे नेण्यापेक्षा यांना कल्याणला येथेच कोठे न्यावे आणि यांना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना शिस्त शिकवावी. प्रथम तर गलिच्छ वस्ती समितीच्या सभापतींना शिकविण्यात यावे. मला तर असे वाटते की १९९८ मध्ये तर श्री. चिजवानी यांनी जो सर्व्हे केला त्याप्रमाणे तुम्ही १७ प्रभाग घ्यायचे म्हणत आहात, तर २००१ मध्ये जो शासनाकडुन सर्व्हे झाला तर १९९८ मधील सर्व्हे राहिला काय? ९८ नंतर २००१, २००१ नंतर सर्व्हे झाला तो मान्य करणार की श्री. चिजवानी यांनी ९८ मध्ये केलेला सर्व्हे मान्य करणार? हा प्रश्न येथे आलेला आहे. आयुक्त साहेब, तुम्हीही लक्ष दया. सन २००२ मधील महापालिका निवडणूकीत आरक्षित असलेले काही प्रभाग २००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत त्यांचे आरक्षण बदलण्यात आले. जे प्रभाग आरक्षित होते ते खुले झाले. श्री. राज असरोंडकर, श्री. प्रशांत धांडे, श्री. गौतम भालेराव, आणि श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे यांचे प्रभाग कसे बदली झाले? तर याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की, शासनाच्या निर्णयानुसार ९ प्रभाग आरक्षित आहेत. त्याच्या व्यतिरिक्त इतर प्रभागातील कामे जर आपण या प्रस्तावात घेतली तर त्या विरोधात मी नक्कीच न्यायालयात धाव घेईन. न्यायालयात जाण्याची तयारी रिपब्लीकन पक्षाची आहे. आरक्षित प्रभागामध्ये १०० टक्के दलित वस्त्या आहेत. आणि त्या झोपडपट्टयामध्ये कोणत्याही सुख सुविधा झालेल्या नाहीत. म्हणुन त्या झोपडपट्टयांमध्ये जास्तीत जास्त विकास कामे होण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने सादर केलेला गोषवारा आज मी बघितला त्यातील परिशिष्ट अ आणि ब काही काही प्रभागांची दोन दोन कामे घेण्यात आलेली आहेत. अशा प्रकारचे काम येथे चाललेले आहे. श्री. शिर्के साहेब, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, १५/११/२००७ मध्ये मा. विशेष समाजकल्याण अधिकारी यांनी देखिल मा. आयुक्त साहेबांना एक पत्र पाठविले आहे. ते पत्र देखिल सध्या माझ्याकडे आहे ते मी वाचुन दाखवितो. मागील वेळेस माझ्याकडे ते पत्र नव्हते त्यामुळे मला जास्त काही चर्चा करता आली नाही. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की,

आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर, जि. ठाणे.

विषय :– दलित वस्ती अंतर्गत मिळणारा निधी दलित वस्तीमध्येच वापरणे बाबत.
संदर्भ:– श्री.बी.बी.मोरे गटनेता, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दिनांक २४/१०/२००७ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भित पत्रानुसार श्री.बी.बी. मोरे गटनेता उल्हासनगर महानगरपालिका यांनी या कार्यालयास कळविले आहे की आपल्या महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. ४७, दिनांक २७/९/२००७ अन्वये शासन मान्य ९ प्रभागा व्यतिरिक्त इतर १७ प्रभाग दलित वस्तीत येत असल्यचा ठराव पारीत केला आहे. म्हणजेच मागे ४७ क्रमांकाचा जो महासभा ठराव झालेला आहे त्यामध्ये तुम्ही तसे पारीत केलेले आहे. अनुसूचीत जाती योजने अंतर्गत आपल्या महापालिकेस या कार्यालयाकडुन जो निधी देण्यात येतो त्या निधी अंतर्गत दलित वस्तीमध्ये जी कामे होता त्या कामाची यादी आपल्याकडुन या कार्यालयास पाठविण्यात आलेली नाही. सदर दलित वस्त्यांची यादी शासनास पाठविण्यांत आवश्यक असल्यामुळे कृपया सदर यादी या कार्यालयास पाठवावी ही विनंती. तसेच यापुढे जो निधी आपणांस अनुसूचित जाती योजने अंतर्गत मिळेल, देण्यात येईल तो निधी कृपया ९ राखीव प्रभागामधील दलित वस्तीतीलच कामासाठी प्राधान्याने वापरण्यात यावा ही विनंती.

याप्रकारचे पत्र आपल्या आयुक्त साहेबांना येथे दिलेले आहे. हा जो गोषवारा आलेला आहे त्याप्रमाणे आपल्या महापालिकेमध्ये जर आपण कामे करणार असाल तर त्यास आमचा कडाडुन विरोध आहे. शासनाकडुन येणारा निधी हा ९ प्रभागांमध्ये वापरला पाहिजे. इतरत्र वापरला तर या महासभेला व दुसरी गोष्ट अशी की उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाला उत्तर देणे जड जाईल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>श्री. मोरे साहेब, एक मिनिट.. आपण काय म्हणता की फक्त ९ प्रभागांमध्येच.....

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>तुम्हांला काय म्हणायचे ते तुम्ही नंतर बोला. मला आधी बोलु दया. तुम्ही सभापती आहात ना? तुम्ही नंतर बोला ना? तर मला एकच सुचावायचे आहे की जर तुम्ही १७ प्रभाग घेतले आज २० घेतले उदया ४० घेतले तर, अहो येथे तर ७६ नगरसेवक निवडून आलेले आहेत. मग बाकीच्या लोकांनी तुमचे काय घोडे मारले आहे? आणि आमचेही काय घोडे मारले आहे. म्हणजेच याचा अर्थ असा की, या महापालिकेमध्ये तोंड पाहुन आणि ज्याचे राजकीय वजन जास्त आहे अशा नगरसेवकांची विनंती मान्य केली जाते आणि त्यांचा प्रकरणे घेतात आणि महासभेपुढे ठेवतात. आणि म्हणुन आमचा या दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २००७–०८ या आर्थिक वर्षात करावयांच्या कामांचा प्रस्ताव सादर करण्याबाबत विरोध आहे आणि विरोध राहणार आहे. तुम्हांला शासनाकडुन याबाबत किती निधी मिळणार आहे आणि किती घ्यायचा आहे? हे जर पाठवायचे होते तर तुम्ही ९ प्रभागातील कामांचेच प्रस्ताव पाठवावयास पाहिजे होते. त्यानंतर १७ किंवा २०, २५ कि ५० प्रभागातील कामांचे प्रस्ताव तुम्हांला पाठवायचे होते. याबाबतचे प्रकरणे नंतर पाठवावयास पाहिजे होती. परंतु तुम्ही तसे काही करत नाहीत. म्हणजे हेही पास होवु नये आणि तेही पास होवु नये आणि झाले तर करोडोवर करोडो खर्चाची कामे असे होईल. माझी महासभेस, मा. महापौरांना, आयुक्तांना व श्री. शिर्के साहेबांना विनंती आहे की, हा जो प्रस्ताव आपण महासभेपुढे ठेवलेला आहे तो चुकीचा आहे. आणि तुम्ही चुकीचे काम करत आहात. या प्रस्तावास आमचा आरपीआयचा पुर्णपणे विरोध आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव मंजुर होवु नये. आणि दलित वस्तीमध्ये जे ९ प्रभाग येतात त्या प्रभागांमध्येच कामे व्हावीत. अन्यत्र हा निधी वापरण्यात येवु नये. एवढेच बोलता, जयहिंद।

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सभागृहातील सर्व सहकारीहो, मा. महापौरजी मी तुम्हांला सांगु इच्छितो की, १९९२ मध्ये जेव्हा सर्व्हे झाला होता तेव्हा माझ्या प्रभागात मिलन नगर, सुभाष नगर, गौतमवाडी व भवानी नगर या चार झोपडपट्टयांचा सर्व्हे झाला होता. भवानी नगर मध्ये ९९ टक्के दलित जनता राहते. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे परंतु तो मंजुर होवुन आलेला नाही. यासाठी शहरातील सर्व झोपडपट्टयांचा सर्व्हे करुन घोषित झोपडपट्टया घोषित करण्याची कार्यवाही करावी. त्याचबरोबर दुसरे एक मी सांगु इच्छितो की, गौतमवाडीमध्ये कोणतेही विकास काम होत नाही. तेथे सर्व दलित बांधव राहतात तेथिल कामांसाठी सुध्दा निधीची तरतुद केली जावी धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>मा. महापौर, मा. आयुक्त, सर्वात प्रथम तर श्री. प्रशांत धांडे यांचे मी अभिनंदन करतो. शासनाकडुन ५ कोटीचा जो निधी मंजुर होवून आला आहे हा निधी इतर सर्व महानगरपालिकांच्या तुलनेत सर्वाधीक आहे. इतर महापालिकांना कुणाला दोन कोटी तर कुणाला तीन कोटी निधी मिळालेला आहे. या प्रस्तावामध्ये या ज्या दोन यादया तयार करण्यात आल्या आहेत त्या फक्त माहितीसाठी आहे. या दोन्ही यादींची एकत्रित यादी तयार करुन ठराव तयार करुन तो लवकरात लवकर शासनाकडे पाठविला जावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—सन्माननीय महापौरजी, या अगोदर मी विचारणा केली होती की, यापुर्वी जे ठराव पारीत करुन आपण शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता त्याचे पुढे काय झाले? शासनाकडुन काही निधी आला आहे का? कामे झालीत का? याबाबतची माहिती देवु शकता का? दोन वेळा या कामांना मंजुरी दिली होती. एकदा १९९८ मध्ये तर दुस—यांदा २००१ मध्ये काही कामांना मंजुरी देवुन प्रस्ताव पाठविला होता. त्याचे काय झाले? त्याबाबतचा निधी मंजुर होवुन आला का? आपण तो खर्च केला आहे काय? यामध्ये दिला आहे काय? आपणांस याचे उत्तर दयावे लागेल. काम केले आहे किंवा नाही केले? त्याबाबतची पुर्वीची स्थिती काय?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—आदरणीय महापौरजी, आदरणीय आयुक्त साहेब, आदरणीय सचिव साहेब, आणि आदरणीय सर्व सदस्यगण,.....

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारीः—कृपया सर्व सदस्यांनी शांत रहावे. श्री. जमनु पुरस्वानीजी कृपया शांत रहा.

सदस्य श्री.बी.बी. मोरेः—मा. महापौरजी, मी जो गोषवारा वाचुन दाखविला आणि जेवढे काही बोललो आहे त्याबाबत सांगु इच्छितो की, इतर कुणा सदस्याने बोलण्या अगोदर श्री. शिर्के साहेब जे कार्यकारी अभियंता आहेत यांनी त्याचे विश्लेषण करावे ना? म्हणुन सर्वांनी शांतता राखावी आणि यासाठी सदस्यांना प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करावा.

सदस्य श्री. विनोद ठाकुरः—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आरपीआय गवई गटाच्या एका नगरसेवकाने, जे गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीचे सभापती आहेत त्यांनी शासनाकडुन ५ कोटी रुपयाचा निधी मंजुर करुन आणला आहे म्हणुन त्यांचे संपुर्ण सभागृहाने अभिनंदन केले पाहिजे. महानगरपालिकेच्या कार्यकालावधीत ५ कोटी रुपयाचा निधी पहिल्यांदाच मंजुर होवून आलेला आहे. त्यास कुणीही विरोध करु नये. शहर विकासाचे काम आहे त्यासाठी ५ कोटी येवोत, १० कोटी येवोत, ३ कोटी येवोत या पैश्यातुन आपले शहराचे विकास काम होईल फक्त विरोध करण्यासाठी विरोध करु नका. दलित वस्तीच्या प्रभागात कामे झाली पाहिजेत अशी आमचीही इच्छा आणि अपेक्षा आहे. परंतु ५० टक्केपेक्षा जास्त दलित वस्ती असलेल्या प्रभागात सुध्दा या निधीतुन कामे झाली पाहिजेत. यासाठी मी मा.बी.बी. मोरे साहेबांना विनंती करतो की आपल्याच आरपीआय गवई गटाच्या एका नगरसेवकाने ५ कोटी रुपयाचा निधी मंजुर करुन आणला आहे. त्यांनी जे प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नांना आपण मदत करु. आणि आणखी जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न करु. धन्यवाद।

सदस्य श्री.बी.बी. मोरेः—सन्माननिय महापौरजी, आताच श्री. विनोद ठाकुर यांनी सांगितले की,.......

सदस्य श्री. प्रकाश सावंतः—सन्माननिय महापौरजी, या प्रस्तावावर स्पष्टीकरण करण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री. शिर्के साहेब यांना व्यासपीठावर बोलावलेले आहे त्यांना या प्रस्तावावर स्पष्टीकरण करु दिले जावे आणि त्यानंतरच इतर सदस्यांनी चर्चा करावी.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारीः—श्री. मोरे साहेब, श्री. शिर्के साहेबांना या प्रस्तावावर स्पष्टीकरण करु दया त्यानंतरच आपण बोला.

सदस्य श्री. बी.बी. मोरेः—श्री. विनोद ठाकुर जे बोलले त्याबाबत एक मिनिटात मी खुलासा करु इच्छितो.

सदस्य श्री. प्रकाश सावंतः—मा. महापौरजी, प्रस्तावावर स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना आपण व्यासपीठावर बोलविले आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरेः—दोन्ही नगरसेवक आरपीआय पक्षाचे आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुरः—एकाच माणसाने बोलायचे, वेळोवेळी बोलायचे नसत श्री. मोरे साहेब.........

सदस्य श्री. बी.बी. मोरेः—परंतु त्याठिकाणी कुणा एखादयाचा प्रभाग किंवा श्री.बी.बी. मोरे यांचा प्रभाग येत असेल आणि तो आरक्षीत असेल तर हे याबाबतचे प्रस्ताव पारीत करुन कामे मात्र दुसरीच करतील. आमच्या

सभापतींना हे अजुन समजलेले नाही की यामध्ये हे लोक काय गडबड करणार आहे. आम्ही सभापतींना विरोध करत नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत:–</u>मा. महापौरजी, या प्रस्तावावर स्पष्टीकरण देण्यासाठी ज्यांना आपण व्यासपीठावर बोलाविले आहे त्यांना स्पष्टीकरण करु दया. आणि यांना खाली बसण्यास सांगा.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>श्री. मोरे साहेब, कृपया बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:–</u>दलित वस्तीतील कामांना विरोध करु नका साहेब......

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>यांची कामे होवु दया. श्री. विनोद ठाकुर यांच्या प्रभागात ५० लाख खर्चाची, एक करोडची कामे होतात आणि श्री.बी.बी.मोरेच्या प्रभागात ५ हजार खर्चाची कामे होतात. अशी ही यांची कामे होवु दया?

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>श्री. मोरे साहेब, तुम्ही जरा शांत रहा. आणि बसुन घ्या.

<u>श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>दलित वस्ती सुधारणा योजनेची मी माहिती सांगत आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>मला सांगितले जाते की तुम्ही सभापतीला विरोध करु नका. या सभागृहातील सत्ताधा–यांनी सभापतीला तुम्ही गुळाचा गणपती बनवुन ठेवला आहे. काय बोलायचे? अहो मी नगरसेवक आहे, रिपब्लीकन पक्षाचा गटनेता आहे. दाखवा माझ्या प्रभागात किती कामे झाली आहेत आणि विनोद ठाकुरच्या प्रभागात किती कामे झाली आहेत? दाखवा, हे सर्व पंचाग मी काढलेले आहे. परंतु ते मानण्याची तेवढी आवश्यकता काय आज भासत नाही आणि म्हणुन मी बोलत नाही. नाहीतर ७६ नगरसेवकांच्या प्रभागात किती किती लाखाची कामे झाली आहेत? ती सर्व माहिती मी काढुन आलेलो आहे. श्री. धांडे यांच्याशी कालच माझे बोलणे झालेले आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:– </u>मा. महापौरजी, संपुर्ण दिवस या चर्चेतच निघुन जाईल. मा. महापौरजी, सभागृहावर आपले कोणतेही नियंत्रण नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:–</u>मा. महापौरजी, आपणांस व आयुक्त साहेबांना विनंती आहे की, सभागृहात एका सदस्याने एकदाच बोलावे त्यास पुन्हा पुन्हा बोलण्यास देवु नये. सभागृहाची काहीतरी शिस्त पाळली पाहिजे. एका सदस्याने पाच मिनिट किंवा १० मिनिट बोलुन आपले बोलणे पुर्ण केले पाहिजे. नेहमी नेहमी बोलुन उभे राहु नये.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>मा. महापौरजी, आपण सभागृहावर नियंत्रण ठेवा. सभागृहावर आपले नियंत्रण नाही. कुणीही मध्येच उठुन बोलत राहतो. या प्रस्तावावर माहिती देण्यासाठी कार्यकारी अभियंता एक तासापासुन व्यासपीठावर उभे आहेत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत:–</u>ज्यांना माहिती देण्यासाठी आपण व्यासपीठावर बोलाविले आहे त्यांना बोलु दिले जावे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u> काही काही सदस्य एकएक तास बोलत आहेत.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>सर्वांनी बसुन घ्यावे. व श्री. शिर्के साहेबांना बोलु दिले जावे.

<u>श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>आदरणीय सर्व सदस्यगण दलित वस्ती सुधार योजना उल्हासनगरमध्ये १९९७ पासुन राबविण्यात येत आहे.

__सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—__साहेब, हिंदीत सांगा कारण की योजनेबाबत कुणालाही माहिती नाही. व योग्य प्रकारे माहिती दया. ११ वर्षामध्ये दलित वस्तीमध्ये किती कामे झालीत? आणि किती वेळ फक्त बहाना करुन प्राकलने तयार केली याची माहिती दया.

__श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—__१९९६—९७ मध्ये ही योजना आलेली आहे. १९९७ मध्ये आपण या योजनेची कार्यवाही सुरु केली आहे. त्यावेळेस एकशे एक कोटी रुपये खर्चाचे प्रस्ताव आपण तयार करुन पाठविला होता. त्यावेळेस सुध्दा ही अडचण उद्‌भवली होती. शासनाचा १९९६ चा जो शासन निर्णय आहे, त्यानंतर १९९८ मध्ये दुसरा एक शासन निर्णय आलेला आहे आणि त्यानंतर आता नव्याने जो शासन निर्णय आलेला आहे तो ५ मार्च २००२ रोजी आलेला आहे. त्यातील मार्गदर्शक तत्वे अशी आहेत की, नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचीत जातीचे जे प्रभाग आहेत त्यांमध्ये दलितांच्या ज्या वस्त्या आहेत त्यामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त दलित वस्ती असली पाहिजे. त्याच ठिकाणी ही योजना राबविता येईल. शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये ही बाब स्पष्टपणे लिहिली आहे. या शासन निर्णयाची प्रत आपल्या महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये पाहण्यास मिळेल. २००६—०७ मध्ये १५१ कोटीचे प्रस्ताव पारीत करुन घेतले होते. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडुन याकामी आपणांस १०६ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. १९९७—९८ मध्ये आपला १६ लाख रुपयाचा निधी शिल्लक होता. आरक्षण असलेल्या झोपडपट्टयांच्या जमिनिवर विकास कामे आपण करु शकत नसल्यामुळे ही कामे प्रलंबित होती. ती १ कोटी ५१ लाखाची ४३ कामे आपण पुर्ण केली आहेत. १ कोटी ६ लाख रुपये पुर्णच्या पुर्ण खर्च केली आहेत. आरक्षण क्र. ४७ नुसार ३ कोटी ५५ लाख रुपये खर्चाच्या प्रस्तावास महासभेने मंजुरी दिल्यानंतर जिल्हाधिका—यांना जे प्रस्ताव पाठविले होते त्यामधील ५२.५ लाखाची १० कामे मंजुर होवुन आली होती. ही १० ही कामे चालु असुन त्यातील ४ कामे आता पुर्ण झाली आहेत. या व्यतिरिक्त दलित वस्तीमध्ये ही जी योजना राबवायची आहे. सन १९९८ मध्ये स्वच्छता निरिक्षक व कनिष्ठ अभियंता यांच्याकडुन सर्व्हे करुन घेण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी १७ झोपडपट्टयांची नावे दिली होती. आता आपले एक सदस्य श्री.बी.बी. मोरे म्हणत आहेत की, १७ प्रभाग आहेत परंतु त्यांना मी सांगु इच्छितो की १७ झोपडपट्टया आहेत ज्यांमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त दलित लोकसंख्या आढळुन आली आहे. त्यानंतर आपल्या येथे कोणताही सर्व्हे झालेला नाही. सर्व्हे होणे आवश्यक आहे. येथे आम्ही जो प्रस्ताव आणला आहे त्यातील परिशिष्ट अ मधील यादी शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना नुसारची आहे. व सर्व्हेक्षणानंतर ज्या १७ झोपडपट्टया प्रमाणित करण्यात आल्या आहेत. त्यानंतर श्री. पाटणकर हे उप—आयुक्त असतांना त्यांनी सुध्दा आणखी ३ झोपडपट्टयांमध्ये दलित वस्ती असल्याचे प्रमाणीत करुन दिले आहेत. तर अशाप्रकारे एकुण २० झोपडपट्टयांमध्ये ५० टक्यांपेक्षा जास्त दलित वस्ती आहे. त्यांच्यासाठी परिशिष्ट ब मध्ये सुचविलेली कामे आहेत. आणि जे आरक्षित ९ प्रभाग आहेत त्यांतील कामांसाठी परिशिष्ट अ मधील कामे सुचविली आहेत. याव्यतिरिक्त ब—याचशा लोकांची मागणी आहे की त्यांच्या प्रभागात सुध्दा दलित वस्ती आहे. त्या झोपडपट्टयांचे नाव विचारले तरी आपणांस कळुन येईल की, तेथे दलित वस्ती आहे. परंतु सर्व्हे झाला नसल्यामुळे आपणाकडे प्रमाणीत असे दस्तऐवज नाही ही सर्व कामे आम्ही परिशिष्ट ब मध्ये दर्शविली आहेत. ही कामे दलितवस्तीमधील आहेत असे जर आम्ही प्रमाणित केले तर त्या कामांचे प्रस्ताव जिल्हाधिका—यांकडे पाठवुन निधींची मागणी करु शकतो.

__सदस्य श्री. किशोर जग्यासी:—__शिर्के साहेब, दलित वस्तीमधील कामांचे ठिकाणे आपण वाढवु शकतो काय?

__सदस्य श्री. सुरेश जाधव:—__मा. महापौरजी, माझ्या प्रभागातध्ये सिध्दार्थ नगर, आणखी एक वसाहत आहे ती मा. महापौरांना सुध्दा माहित आहे. या वस्त्यांमध्ये १०० टक्के दलित वस्ती आहे. तरी सुध्दा त्याचा अजुनपर्यंत सर्व्हे केलेला नाही. माझी आपणांस विनंती आहे की आपण आदेश दयावा की पुर्ण शहराचा सर्व्हे करावा आणि ज्या ज्या ठिकाणी दलित वस्ती आहे त्यांचा सर्व्हे करावा.

__सदस्य श्री. प्रशांत धांडे:—__मा. सदस्य श्री. सुरेश जाधव साहेब यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, तो बरोबर आहे कारण की आपल्या उल्हासनगर शहरामध्ये ब—याच झोपडपट्टया आहेत. परंतु दलित वस्त्या ज्या आहेत त्याठिकाणी महानगरपालिकेमध्ये योग्य असा सर्व्हे झालेला नाही त्यामुळे अशा हा गोंधळ निर्माण होत राहतो. ज्यावेळेस या योजनेअंतर्गतचा निधी येत राहतो त्यावेळेस सर्वच सदस्य सांगत राहतात की, या योजने अंतर्गत आमच्या प्रभागातील कामे घ्या, आमच्या प्रभागातील कामे घ्या. ज्यांच्या प्रभागील कामे घेतली जात नाही त्यांना राग येतो आणि ते रुसवा करतात. यासाठी मी आपणांस विनंती करतो की आपण या एक दोन दिवसामध्ये आदेश काढुन उल्हासनगर शहराचा पुर्ण सर्व्हे केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत तेथे सर्व्हे झाला पाहिजे. अशी विनंती करतो त्याचबरोबर महासभेला सुध्दा अशी विनंती करतो आणि श्री. बी.बी. मोरे

साहेब यांनाही विनंती करतो की, मागच्या वेळेस अशाच प्रकारचा ठराव महासभेत आणलेला होता आणि तोही आपण पारीत करुन घेतलेला होता. आताही मी त्यांना विनंती करतो की आता हा ठराव पारीत केला जावा. या योजनेअंतर्गत जो निधी येणार आहे त्या सर्वांची कामे झाली पाहिजेत. उल्हासनगर शहराचा विकास झाला पाहिजे. जेथे आपण राहतो त्याची जाणीव आपल्याला आहे. आपले प्रभाग कसे आहे? समजा एकदा प्रभाग खुला असेल किंवा इतर मागासवर्गीयसाठी राखीव असेल त्याठिकाणीही काही दलित वस्ती असतेच त्याठिकाणी सुध्दा या योजनेतुन कामे झाली पाहिजेत. कारण की आपण आरपीआय पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाचे उपाध्यक्ष आहात, नगरसेवक आहात, गटनेते आहात. म्हणुन आपण केवळ आपल्या प्रभागापुरता विचार न करता संपुर्ण शहराचा विचार करावा. ज्या ज्या ठिकाणी झोपडपट्ट्या आहेत त्या त्याठिकाणी या योजनेतुन कामे झाली तर तेथिल लोक आपणांस आश्वासन देतील आजपर्यंत आपल्या वस्त्यामध्ये विकास कामे झालेली नाहीत. म्हणुन या प्रस्तावाप्रमाणे आपण कामे केली तर आपलेच लोक आपणांस आर्शिवाद देतील. यासाठी आपण चांगल्या पध्दतीने काम करु या. आणि सर्व झोपडपट्टयांमध्ये या योजनेतुन कामे झाली पाहिजेत त्यासाठी निधि उपलब्ध करुन दिला पाहिजे. यासाठी मी श्री.बी.बी. मोरे साहेबांना विनंती करतो की त्यांनी हा प्रस्ताव एकमताने पारीत करावा विरोध करु नये आणि लवकरात लवकर म्हणजे या मार्च अखेरीस हा प्रस्ताव शासनाकडे गेला पाहिजे. आणि या यादीमध्ये ज्या कुणा नगरसेवकांच्या प्रभागातील कामे अंतर्भुत करावयाची असतील तर त्यांचाही अंर्तभाव करु या आणि सर्वांच्या प्रभागामध्ये कामे करण्यासाठी एकत्रित एकच यादी पाठवु या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>महापौर साहेब, प्रभाग क्र. ६ मध्ये महात्मा फुले नगर, संत रोहिदास नगर येथिल कामांचा यादीमध्ये समावेश केला जावा.

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार:–</u>मा. महापौर साहेब, मला बोलु दिले जावे. एक–एक सदस्य वारंवार बोलत आहे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>जे बोलत आहेत त्यांना त्यांचे बोलणे तर पुर्ण करु दया.

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार:–</u>श्री. भुल्लर महाराज, मला बोलु दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u> ठिक आहे आपण बोला.

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार:–</u>मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, सचिव साहेब, आज दलित वस्तीतील कामांचा प्रस्ताव आपणासमोर आलेला आहे हा चांगला विषय आहे. त्याबाबत आमची अशी विनंती आहे की जे काही कायदयाने होत असेल ते तुम्ही करा. कामे करु नका असे आम्ही सांगत नाही. परंतु कायदयाप्रमाणे, जनगणनेप्रमाणे करा. २००१ मध्ये जी जनगणना झाली तीची आकडेवारी २००८ मध्ये तुम्ही कशी मान्य करणार? कोणती जनगणना रद्द करणार? गोषवा–यामध्ये १९९८ जनगणना झाली त्याचा उल्लेख केला आहे. मग तुम्ही २००१ च्या जनगणनेनुसार कामे करणार ना? म्हणुन ज्या दलित वस्त्या आहेत त्यांनाच सुविधा उपलब्ध करुन दया. बाकी ज्या वस्त्या आहेत त्यांमध्ये सर्वसाधारण निधीतुन तुम्ही कामे करु शकता. मी सुध्दा गलिच्छ वस्ती सुधार योजनेची सभापती होते. आम्ही सुध्दा जिल्हाधिका–यांकडुन निधी मंजुर करुन आणला होता व प्रत्येक प्रभागामध्ये या योजनेतुन काम केले होते. हा प्रश्न आर्शिवादाचा नाही. एखादयाच्या ताटातील भाकरी ओढुन आपण खाणार ही काही आर्शिवादाची गोष्ट नाही. कायदयानुसार जेथे कामे करावयाची आहेत तेथेच तुम्ही कामे करा. बाकीची कामे दुस–या निधीतुन तुम्ही करु शकता. नाहीतर शासनाने जो शासन निर्णय काढलेला आहे त्याचा अर्थ काय राहिल. मग उदया प्रत्येक नगरसेवक सांगेल की माझ्या प्रभागात सुध्दा दलित वस्त्या आहेत, माझ्या प्रभागात सुध्दा या निधीतुन कामे केली जावीत. म्हणुन शासन निर्णयानुसार कामे केली जावीत. बहुमताच्या जोरावर जर तुम्ही हा विषय पारीत करुन घेणार असाल तर आम्ही न्यायालयात धाव घेवु, स्थगिती आदेश आणु. परंतु तुम्ही शासन निर्णयाच्या विरोधात काम करु नका.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मा. महापौर, उल्हासनगरमध्ये एकुण १०९ झोपडपट्टया आहेत, १०९ पैकी......... श्री. शिर्के साहेब किती झोपडपट्टया आहेत? पैकी ४८ घोषित झोपडपट्टया आहेत. श्री. मोरे साहेब तुम्ही ऐकुन घ्या, अगोदर तुम्ही शिस्तीचे धडे दयायचे, तुम्ही ऐकत नाहीत म्हणुन म्हणायचे , आता मध्येच तुम्ही बोलत आहात. तुम्ही शिस्त पाळा. मी श्री. शिर्के साहेबांनाच विचारत आहे. शिर्के साहेब, एकुण झोपडपट्टया किती आहेत?

__श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—__उल्हासनगरमध्ये ४८ घोषित झोपडपट्टया आहेत व ९१ अघोषित झोपडपट्टया आहेत.

__सदस्य श्री. धनंजय बोडारे:—__९१ आणि ४८ म्हणजे एकुण किती झाल्या? १३९, पैकी ४८ घोषित झोपडपट्टया बाकीच्या अघोषित घोषित केलेल्या ज्या झोपडपट्टया आहेत त्या कधी घोषित केल्या आहेत? १९८७ साली श्री. चिजवानी हे अभियंता असतांना त्यांनी कनिष्ठ अभियंता यांना काम दिले, कनिष्ठ अभियंत्यांनी हे काम मेस्त्रिी वर सोपविले. त्यांच्या लक्षात ज्या झोपडपट्टया आल्या त्यांनी त्या घोषित केल्या. आणि बाकीच्या ज्या राहिल्या त्या अघोषित. त्यांची जी कारणे होती ती ज्यांच्यावर आरक्षणे आहेत त्या झोपडपट्टया अघोषित. ज्या आरक्षण विरहीत आहेत त्या घोषित. आणि त्यांच्यामध्ये २४ झोपडपट्टया ५० टक्केच्या वर दलित लोकसंख्या असलेल्या आहेत.

__उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—__श्री. मोरे साहेब, तुम्ही जरा शांत रहा.

__सदस्य श्री. धनंजय बोडारे:—__बोलु दया, बोलु दया. त्यांना विरोध करायचा आहे. त्यांना समजु तर दया. २४ झोपडपट्टया या दलित वस्तीतील आहेत. वर्षानुवर्ष आपण त्या झोपडपट्टयांमध्ये काम करत होतो. दलित वस्तीसाठी शासनाकडुन येणारा निधी उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील सर्व विभागांमध्ये जावा. त्यासाठी ज्या झोपडपट्टीमध्ये ५० टक्याच्यावर दलित वस्ती असेल त्याठिकाणी मागीलवर्षी शासनाचे कुठलेतरी एक पत्र आले असे या ठिकाणी सांगण्यात आले. परंतु मंजुर करतांना संपुर्ण वस्तीसाठीच तो ठराव आपण मंजुर केला होता. परंतु श्री. धांडे यांनी त्या प्रभागांसाठी लक्ष दिले नाही. आम्ही मान्य केले. ९ प्रभागांमध्ये वर्षानुवर्ष विकास कामे झाली नाहीत असे श्री. धांडे यांचे सांगणे होते. श्री. बी.बी. मोरे यांचेही सांगणे होते. परंतु त्यावेळेस चर्चा अशी झाली होती की, संपुर्ण उल्हासनगरमधील दलित वस्त्यांमधील कामे व्हावीत. दलित वस्ती मग ती घोषित नसेल, काही तरी तांत्रिक अडचण असेल, परंतु तेथे दलित आहेत. ब—याचशा वसाहती अशा आहेत जसे महात्मा फुले नगर, भय्यासाहेब आंबेडकर नगर, हनुमान नगर या घोषित नाहीत, परंतु तेथे १०० टक्के दलित लोक राहतात. वडार कॉलनी घोषित झोपडपट्टी नाही. परंतु तेथे १०० टक्के दलित लोक आहेत. त्या लोकांनी कोठे जायचे? हे करत असतांना दलित वसाहतीमधील कामे कमी करा असे आम्ही कुठेही म्हटले नाही. उलट शासकिय योजनांचा जास्तीत जास्त फायदा उल्हासनगर शहरवाशियांना व्हावा. त्यासाठी कुणाचीही अडचण असु नये. हा काही महापालिकेचा निधी नाही शासनाचा निधी आहे. ही सर्व चर्चा करण्यासाठी आपल्याला वेळ सुध्दा नाही. कारण की या ३१ तारखेचा आत हा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविला नाही तर मागचा निधी आणि हा निधी ५ कोटी आणि ३ कोटी असाच हातुन निघुन जाईल मग उपयोग काहीच होणार नाही. म्हणुन जास्त काही चर्चा न करता आता जो प्रस्ताव आलेला आहे तो पारीत करुन जे शासनाचे निकष आहे, नियम आहे, ५० टक्के दलित वस्तीवाल्यांना दयायचा की ५० टक्के प्रभागवाशियांना दयायचा हे शासन ठरवेल. परंतु आपणच मोठा विचार केला पाहिजे. संपुर्ण उल्हासनगर मधील दलित वसाहती मध्ये मग त्या घोषित असो कि अघोषित. मी तर असे म्हणतो की अघोषित झोपडपट्टयांमध्ये विकास कामे करण्यासाठी तुम्ही प्रस्ताव पारीत करा. शासनाचा निधी आहे. गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडुन खाल्ली. शासनाचा निधी आहे, महापालिकेचा निधी असता तर गोष्ट वेगळी होती.

__श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—__दलित वस्तीसाठी घोषित अघोषित झोपडपट्टी अशा निकषांची गरज नाही. फक्त ५० टक्केच्यावर दलित लोकसंख्या असली पाहिजे. अनुसूचीत जातीच्या लोकांची लोकसंख्या ५० टक्क्याच्यावर असली पाहिजे.

__सदस्य श्री. धनंजय बोडारे:—__त्यासाठी केवळ प्रभागापुरती मर्यादीत न राहता उल्हासनगरमधील ज्या ज्या झोपडपट्टयांमध्ये ५० टक्यांच्यावर दलित लोकांची वस्ती आहे किंवा लोकसंख्या आहे, किंवा ज्यांनी जनगणना करायची आहे ते शासनाचे प्रतिनिधी येवुन पाहतील परंतु झाला फायदा तर संपुर्ण उल्हासनगरचा होईल. कुणाच्या खिश्यातले काढुन दुस—याच्या खिश्यात टाकायचे आहे असे काही नाही. तुम्हांला मिळायचे ते मिळणार आहे. परंतु त्या लोकांना जर मिळणार असेल तर तुमची अडकती होता कामा नये. आता वेळ कमी आहे. माझी विनंती आहे की, हा ठराव सर्व संमतीने पारीत करावा. आणि मन मोठे करा, लोकांना असे दाखवुन दया की संपुर्ण सभागृह दलित वस्तीच्या मागे आहे. आमच्या प्रभागापुरते आम्ही मर्यादीत नाही. उल्हासनगरमधील दलित वस्त्यामधील लोकांच्या मागे हे संपुर्ण सभागृह आहे. आणि पुढची प्रक्रिया म्हणजे ४८ घोषीत झोपडपट्टयांमध्ये वाढ करण्यासाठी आणखी झोपडपट्टया कश्या घोषीत करता येतील याबाबत कार्यवाही करण्यात यावी. कारण

की १३९ मधील फक्त ४८ झोपडपट्टया घोषित असाव्यात आणि ९१ झोपडपट्टयांनी शासकिय सेवेतपासुन वंचित राहतील असे होवू नये यासाठी झोपडपट्टया घोषित करण्याची कार्यवाही चालु करावी.

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–आयुक्त साहेबांना आदेश देण्यात येत आहे की, जनगणना अगोदरच्या पहिल्या आणि दुस–या टप्प्यात झाली त्यामध्ये ज्या झोपडपट्टया राहील्या आहेत त्यांची लवकरात लवकर जनगणना करायला हवी आणि ही प्रक्रिया जलद गतीने सुरु करावी.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–आता आता ज्या झोपडपट्टयांची कामे या प्रस्तावातील कामांमध्ये जोडली आहेत ती कृपया महासभेत वाचुन दाखविली जावी. सभापती महोदयांनी जी नविन यादी आता आता दिली आहे ती सभागृहात वाचुन दाखविली तर बरे होइल.

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:– मा. सभागृह नेता, मा. सर्व गटनेते, यांना असे कळविण्यांत येते की, परिशिष्ट अ आणि परिशिष्ट ब असे न करता सर्व कामांची एकच यादी तयार करुन पाठविण्यात यावी.

काही सदस्य :–पास, पास...................

सदस्य श्री. मोहन साधवानी:–मा. महापौरजी, ही जी नविन यादी देण्यात आली आहे ती समाविष्ट करण्यात यावी.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:–मा. महापौरजी आमचा विरोध आहे. पाहिजे तर या प्रस्तावावर तुम्ही मतदान घेतले तरी चालेल.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :–दलित वस्तींच्या कामांना विरोध?

काही सदस्य:– सेम, सेम........

सदस्य श्री.बी.बी. मोरे:–विरोध का करत आहोत ते आम्हांला माहित आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी:–कुणाला मंजुर नसेल तर मतदान घ्या. मा. महापौरजी हा प्रस्ताव सर्व संमतीने मंजुर करणे कुणाला मान्य नसेल तर या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:–परिशिष्ट अ आणि ब अशा दोन वेगवेगळया यादया पाठविण्याचे कारण हेच आहे की, . ....

सदस्य श्री. मोहन साधवानी:– एकच यादी तयार करुन पाठवत आहोत. या प्रस्तावाबाबत आपण सर्वात प्रथम पुरावा घ्यावयास पाहिजे होता.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:–हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत होणार नाही, होणार नाही.......

सदस्य श्री. सतिश चहाळ:–दलित वस्तीचे कामे झाली पाहिजे आमचा त्यास विरोध नाही परंतु जो निधी येणार आहे तो दलित वस्तीतच वापरला गेला पाहिजे, हेच आमचे म्हणणे आहे दलित वस्तीतील कामे झाली पाहिजेत. हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत करण्यास आमची काही हरकत नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:–हा निधी इतर वस्त्यांमध्ये वापरला जातो. इतर झोपडपट्टयांमध्ये हा निधी वापरण्यासाठी हे सर्व चालले आहे. आणि म्हणुनच ही आगपाखड आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:–ज्या लोकांचा विरोध आहे, त्यांची या प्रस्तावातील कामे काढुन टाका.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ..........

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—**काही लोक दलित वस्तीतील कामांनाच विरोध करत असतील तर काय करायचे त्यास? म्हणजे त्यांना निधी नको आहे असे त्यास म्हणायचे आहे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**उल्हासनगर शहराच्या विकासासाठी दलित वस्तीचा जो निधी आलेला आहे ....

**काही सदस्य :—**पास,पास.....

**सदस्य श्री.बी.बी.मोरे:—**नाही,नाही आमचा विरोध आहे, विरोध आहे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—** या ठिकाणी मी आवर्जुन सांगेन की, मागच्या वेळी महासभेत मी बोललो होतो. या शहराचे आरपीआयचे आमदार मा. पप्पु कालानी यांनी सर्व सन्माननिय सदस्यांना एका बैठकीस सांगितले होते की, शासनाचा कोणताही निधी आला तर त्यास तुम्ही विरोध करु नका. या शहराचा जास्तीत जास्त विकास झाला पाहिजे यासाठी समाजकार्याकडे तुम्ही लक्ष दया. राजकारणाकडे तुम्ही लक्ष दया. अशी राष्ट्रवादी पक्षाच्या सदस्यांना माझी विनंती आहे. हा जो निधी आलेला आहे तो उल्हासनगरमधील सर्व प्रभागांना मिळणार आहे. याठिकाणी गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीचे सभापती श्री. प्रशांत धांडे यांनी कुठलाही पक्षपात न करता नि:पक्षपातीपणे सर्व दलित वस्त्यांना त्या त्या सदस्यांना निधी पोच करण्याचा प्रयत्न केला आहे. ५ कोटी रुपयांचा निधी प्रयत्न फार थोडया कालावधीत त्यांनी यशस्वी केला आहे. म्हणुन सर्व सन्माननिय सदस्यांच्या वतीने मा. श्री. प्रशांत धांडे यांचे कौतुक व अभिनंदन करतो त्यांनी अतिशय मेहनत घेवुन त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा करुन निधी आणला आहे आणि आपल्या शहराचा, दलित वस्त्यांचा मोठया प्रमाणात विकास होणार आहे. यासाठी याठिकाणी माझी विनंती आहे, जे कुणी विरोध करत असतील त्यांनी विकासाच्या कामासाठी विरोध करु नये. कारण की याठिकाणी विकास कामांसाठी राजकारण आणू नये. समाजकार्य करावे. अशी मी आपणाांस विनंती करु इच्छितो आणि सर्व पक्षांचे सदस्य या प्रस्तावाला मान्यता देतील. अशी याठिकाणी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद।

**सदस्य श्री. मोहन साधवानी:—**या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

**सदस्य श्री. गणपत एडके:—**मा. महापौर साहेब, याठिकाणी श्री. गायकवाड साहेब जे बोलले की सन्माननिय आमदार यांनी सांगितले की, शासकिय निधितील कामांसाठी विरोध करु नका असे सांगितले आहे. आम्ही या प्रस्तावास विरोध कुठे करत आहोत.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**मा. महापौर साहेब, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचा या प्रस्तावास विरोध नाही. गलिच्छ वस्त्यांमधील विकास कामांसाठी श्री. प्रशांत धांडे यांनी हा जो प्रस्ताव येथे आणला आहे त्यासाठी आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:—**राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या वतीने आम्ही आपल्या या प्रस्तावाचे समर्थन करतो.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—**या प्रस्तावास मान्यता दिली त्याबद्दल सर्व सन्माननिय सदस्यांचे धन्यवाद. ज्यांनी विरोध केला असेल त्यांचेही अभिनंदन.

**महापालिका सचिव:—**कृपया लक्ष दया. यादी माझ्या पुढे आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**आमचा या प्रस्तावास विरोध आहे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर:—**श्री. बी.बी. मोरे साहेब, सभागृहात तुम्ही काय एकटेच आहात काय? या यादीमध्ये तुमच्या प्रभागातील ३५ लाखाचे काम आहे तुम्ही कसा या प्रस्तावास विरोध करता? तुम्ही का विरोध करता नेहमी नेहमी?

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**एक लक्षात घ्या. मी तुम्हांला सागंतो, आमचा विरोध आहे.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारीः–**श्री. मोरे साहेब, कृपया बसुन घ्या. सचिव साहेब या प्रस्तावर मतदान घ्या.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**श्री. बी.बी. मोरे हे नेहमी नेहमी एकटेच उभे राहुन बोलत राहतात.

**सदस्य श्री.बी.बी. मोरेः–**अहो, तुम्ही १०–१० वेळा बोलतात तेव्हा?

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारीः–**बसुन घ्या, कृपया बसुन घ्या.

**महापालिका सचिवः–**गोषवा–याच्या हिशोबाने अ परिशिष्टामध्ये ५४ कामे आहेत व ब मध्ये ४७ आहेत या व्यतिरिक्त आणखी १२ कामांची यादी आलेली आहे. तिचा समावेश करण्याचा येथे प्रस्ताव आलेला आहे. आपली इच्छा असेल तर ती मी वाचुन दाखवितो नाहीतर १२ कामे समाविष्ट केले जातील.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**ती १२ कामे सुध्दा समाविष्ट केली जावीत.

**महापालिका सचिव :–**यादी एकच करायची आहे काय?

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**होय, एकच यादी तयार केली जावी.

**महापालिका सचिव :–**जे सन्माननिय सदस्य हा प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने ५५ मते**

१ श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान
२ श्री. सुरेश मधुकर जाधव
३ श्री. गोविंदराम डोलुमल लुंड
४ श्री. ठाकूर विनोद लालसिंग
५ श्रीमती वनवारी मोना अशोक
६ श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
७ श्रीमती निलम प्रेमसिंग रावत
८ श्रीमती मनसुलकर शिला सुभाष
९ श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
१० श्री. दत्तात्रय नारायण पवार
११ श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी
१२ श्री. प्रशांत किशनराव धांडे
१३ श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी
१४ श्री. हरेश परमानंद जग्यासी
१५ श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद
१६ श्री. लाल देवनदास पंजाबी
१७ श्री. आयलानी कुमार उत्तमचंद
१८ श्री. बच्चाराम रूपचंदानी
१९ श्री. सुखरामानी महेश पहलाजराय
२० श्रीमती जया प्रकाश माखीजा
२१ कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल
२२ श्रीमती शकुंतला पाटील
२३ श्री. चव्हाण रमेश महादेव
२४ श्री. बोडारे धनंजय बाबूराव
२५ श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज)
२६ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे

२७ श्री. रामसागर जनार्दन यादव
२८ श्री. गायकवाड दिलीप
२९ श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
३० श्रीमती मीना सोनेजी (सोंडे)
३१ श्रीमती बोडारे वसुधा धनंजय
३२ श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र
३३ श्री. मुकेश सोहन तेजी
३४ श्री. विजय खंडु सुपाळे
३५ श्री. शेखर केशव यादव
३६ श्रीमती विद्या विजय निर्मले
३७ श्रीमती ज्योती शाम माने
३८ श्री. पाटील प्रधान धर्मा
३९ श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर
४० श्री. मोहन साधवानी
४१ श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास
४२ श्रीमती रजनी महाडिक
४३ श्री. सुंदर आसनदास मंगतानी
४४ श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील
४५ श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे
४६ श्रीमती वेलकर सुरेखा राजन
४७ श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती
४८ श्री. एडके गणपत गोविंद
४९ श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा
५० श्री. रविंद्र दशरथ बागूल
५१ श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
५२ श्रीमती संगीता राजेश कंडारे
५३ श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी
५४ श्री. नीलु ठाकुर चांदवाणी
५५ श्री. लालबिहारी बुझारत यादव

<u>महापालिका सचिव :—</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. आरपीआयच्या चार सदस्यांचा विरोध आहे ना?

<u>प्रस्ताव पारीत करण्याच्या विरोधातील ४ मते</u>

१ श्री. मोरे भानजी भिकाजी
२ श्री. ढोके जनार्दन किशनराव
३ श्रीमती पंचशिला नाना पवार
४ श्रीमती लता शांताराम निकम

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, ज्या सदस्यांचा या प्रस्तावास विरोध आहे त्यांच्या प्रभागातील कामे या प्रस्तावातुन वगळली पाहिजे असे माझे मत आहे कारण की ते विरोध करत आहेत त्यामुळे त्यांच्या प्रभागात या निधीतुन कामे करुन घेण्याचा त्यांचा कोणताही हक्क राहत नाही.

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय** :— उल्हासनगर शहरात दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत काही विकास कामांकरिता निधी मागणीचा प्रस्ताव मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>.

दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.विघयो—१०२००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि—४ दिनांक ५/३/२००२ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जातीच्या प्रभागामध्ये मुलभूत सोयी,सुविधांची कामे नगररचनाकार यांचे शिफारशीने मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची मान्यता घेऊन त्यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात येणा—या निधीमधून करणे आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर मध्ये ९ प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. तसेच २० दलित वस्त्यांना तत्कालीन नगररचनाकार यांनी मान्यता दिली आहे. सदर प्रभागांमधील दलित वस्तीतील कामांचे संबंधित नगरसेवकांनी सुचविलेली रु.५,२१,९८,३२०/— एवढया खर्चाचे विविध मुलभूत सोयींची सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' यादीप्रमाणे एकूण ५४ कामे प्रस्तावित आहेत. तथापी महानगरपालिकेच्या अन्य काही मा.नगरसेवकांनी त्यांचे प्रभागातील वस्त्यांमध्ये दलित वस्त्या असून तेथे अनुसूचित जातीच्या रहिवाशांची लोकसंख्या जास्त असल्याचे निदर्शनास आणून त्या वस्त्यांमध्ये कामांची मागणी केली आहे. सदर कामे परिशिष्ट 'ब' प्रमाणे आहेत. या कामांच्या ठिकाणी असलेल्या वस्त्यांमध्ये सर्वेक्षण करुन ज्या वस्त्यांमध्ये अनुसूचित जातीच्या रहिवाशांची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त होईल तेथे या योजनेअंतर्गत कामे हाती घेता येऊ शकतात.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी योजनेअंतर्गत रु.५.०० कोटी इतकी तरतूद असल्याचे दिनांक २५/३/२००८ रोजीच्या पत्राद्वारे मा.श्री.प्रशांत धांडे, सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. शासन मार्गदर्शन तत्वांनुसार प्रस्तावित कामांना महासभेची मान्यता आवश्यक आहे. तसेच सदर कामांचे नकाशे नगररचनाकार यांचेकडून मान्य करुन घेणे आवश्यक आहे तसेच मागील निधीचे विनियोगिता प्रमाणपत्रही देणे आवश्यक राहिल. या सर्व कार्यवाहीस अवधी लागणार आहे. सद्यस्थितीत मार्च अखेर असल्याने आर्थिक वर्षाच्या समाप्तीपूर्वी मा.नगरसेवकांनी सुचविलेल्या कामांना महासभेकडून मान्यता घेण्याकरीता प्रस्तावित आहे. परंतू सदर योजनेअंतर्गत कामे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्याच्या अनुसूचित जातीच्या वस्तींमध्येच घेण्याकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

सभेतील चर्चेअंती एकुण ११६ कामांची एकत्रित यादी करुन रुपये ९,३७,७४,८२०/— च्या निधीचा प्रस्ताव सुधारीत सूचनेमुळे मान्य करण्यास महासभेपुढे प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र. ७३ दिनांक :— २९/३/२००८

सुचकाचे नाव:—श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव:— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या प्रभागामध्ये ११६ विकास कामांकरीता रु. १०,०२,८७,८२०/—निधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास व शासनाकडे निधीच मागणी करण्यास मान्यता देत आहे.

सदरहु यादी या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उप—महापौर /पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत वर्ष २००७—२००८ करीता प्रस्ताव

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|---|
| १ | ५ | उल्हासनगर—१ वाल्मिकी नगर येथील वाल्मिकी मंदीरजवळ, किरण वॉल्टर घरासमोर, राजेंद्र मरोतिया, बाबु मरोतिया, सुरेश बौध्द, राणी बौध्द, परशा बौध्द यांचे घराजवळ व साईबाबा किराणा स्टोर याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | १०००००० |
| २ | ३७ | उल्हासनगर—२ येथील दुर्गा माता नगर, राणा ट्रेडींग को. येथील कल्व्हर्ट ते भिशम वखार पर्यंतचा रस्ता एम—३५० ने व नाली बनविणे. | ५७५६०० |
| ३ | ३७ | उल्हासनगर—२ येथील रामचंद किराणा, जगनगया कौर, डंपींग ग्राऊंड ते सागर रिपेरिंग दुकान मार्गे कलाबाई मोरे यांचे घरापर्यंत एम—२५० ने रस्ता व नाली बनविणे. | ११३३५०० |
| ४ | ३७ | उल्हासनगर—२ रामदेव मंदीराजवळ, साईदिप यांचे घराजवळ एम—२५० ने रसता व नाली बनविणे. | ११३३५०० |
| ५ | ३७ | उल्हासनगर—२ रामदेव नगर, भैयासाहेब आंबेडकर नगर येथील बबन येवले, बुध्द विहार जवळ, विठ्ठल बनसोडे यांचे घर, भिमराव पेंटर यांचे घर, नाना गोडबोले, भारत निवास, राम जयस्वाल, हमीद अली यांचे घर याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ८०९००० |
| ६ | ३८ | उल्हासनगर—२ हनुमान नगर येथील हनुमान मंदीर ते बुध्द विहार जवळील साकव पर्यंत एम—२५० ने रस्ता व नाली बनविणे. | १४९७९०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ३८ | उल्हासनगर–२ येथील नागेश किराणा, देवराज सिंग यांचे घर, शिवाजी साठे यांचे घर, लक्ष्मण काटे यांचे घर, व्यंकटेश यांचे घर, शिव लाल यादव यांचे घर, सुभाष यादव, हनुमान नगर याठिकाणी एम–२५०२ ने रस्ता व नाली बनविणे. | ७०१५०० |
| ८ | ३८ | उल्हासनगर–२ येथील शिवा गवळी यांचे घर, रणजित पाल, लक्ष्मी किराणा, बबन मिश्रा, अनिल पांडे, पासवान यांचे घर याठिकाणी सि.सि. पायवाटा व नाली बनविणे. | २४३४०० |
| ९ | ४ | उल्हासनगर–१ दत्त वाडी येथील हरीजन वस्ती ते हरमन मोहता कंपाउंड पर्यंत नाला बनविणे. | १४३७३०० |
| १० | ३३ | उल्हासनगर–३ गौतम बुध्दनगर येथील छबुसिंग लबाना ते गुरुप्रसाद खरवास, हरिओम निवास, शेट्टी यांच्या घरासमोरील, विश्वकर्मा हाउस शिवा शोभा घरापर्यंत नाला कव्हर (बंदीस्त) करणे. | १०४२००० |
| ११ | ४० | उल्हासनगर–३ गरीबनगर येथील कृष्णा सातपुते घरापासून श्री.हरि शिंदे यांच्या घरापर्यंत पांडूरंग कांबळे यांच्या घरापासून मारुती अवघडे यांच्या घरापर्यंत लिंबा पवार, दिलीप शिंदे यांच्या घरापासून समाज मंदीरपर्यंत पायवाटा नाल्या व पेव्हरब्लॉकचे काम करणे. | १२९४८०० |
| १२ | ४० | उल्हासनगर–३ गरीबनगर येथे जुन्या समाज मंदीराच्या जागेवर नविन समाजमंदीर बनविणे. | १३९९००० |
| १३ | ४३ | उल्हासनगर–३ सम्राट अशोक नगर येथील ढोके यांच्या घराजवळ व स्टेज जवळ मातोश्री रमाबाई आंबेडकर शाळेच्या परिसरात पायवाटा व नाल्या बनविणे. | ५०४६०० |
| १४ | ४३ | उल्हासनगर–३ येथील सम्राट अशोक नगर येथील एम.एस.इ.बी. ते हिरामण वाघ यांच्या घरापर्यंत नाला बनविणे. | ९९७१०० |
| १५ | ४३ | उल्हासनगर–३ येथील सम्राट अशोक नगर येथील हिरामण भालेराव यांच्या घरापासून मनोज मटन शॉप पर्यंत नाला बनविणे. | १४९५००० |
| १६ | ४५ | उल्हासनगर–३ येथील फस्टगेट समोर आनंदनगरच्या बाजूस एम.जे.पी. क्वार्टर जवळील नाला बनविणे. | १४९५००० |
| १७ | ४५ | उल्हासनगर–३ येथील राधा अपार्टमेंट ते खन्ना फॅक्टरीपर्यंत नाला बनविणे. | १४७०३०० |
| १८ | ४५ | उल्हासनगर–३ इमली पाडा येथील जुने समाजमंदीराच्या जागेवर नविन समाजमंदीर बनविणेबाबत. | १४२६७२० |
| १९ | ४५ | उल्हासनगर–३ येथील आनंदनगर, वॉटर सप्लाय कंपाउंडच्या बाजूला समाजमंदीर बनविणे. | १३३९००० |
| २० | ७ | उल्हासनगर–१ प्रबुध्द नगर मधील वाघ यांचे घर ते बुध्द विहार पर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५००००० |
| २१ | ७ | उल्हासनगर–१ प्रबुध्द नगर मधील सकट यांचे घर ते वाघमारे यांचे घर याठिकाणी एम–२५० रस्ता व नाली बनविणे. | ५००००० |
| २२ | ७ | उल्हासनगर–१ क्रांति नगर येथील सरस्वती मंदीर ते अंबिका राय यांचे घरापर्यंत एम–२५० ने रस्ता व नाली बनविणे. | १०००००० |
| २३ | ८ | उल्हासनगर–३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथील राजू यांचे घर ते कबिर यांचे घर, मंगला यांचे घर ते तांबे यांचे घर, देशमुख यांचे घर ते मोरे घर, शाह घर ते हरबंस तबेला, याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. | ९४८००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | ८ | उल्हासनगर–३ बाबासाहेब आंबेडकर नगर येथील अशोक मोरे यांचे घर ते दिपक गॅरेज पर्यंत नाला बनविणे. | ८१८३०० |
| २५ | ८ | उल्हासनगर–३ प्रबुध्द नगर येथील इश्वर जैन यांचे घर ते बुध्दविहार, दिलीप सोनावणे ते दिलीप अहिरे यांचे घर, रतन ब्राम्हणे यांचे घर ते अशोक तायडे पी.सी.ओ.पर्यंत सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. | ८६५२०० |
| २६ | ५१ | उल्हासनगर–४ वाल्मिकी नगर येथील संजय बनसोडे यांचे घराजवळ सि.सि.पायवाटा, नाली व चेकर्ड टाईल्स बसविणे. | १०००००० |
| २७ | ५१ | उल्हासनगर–४ वाल्मिकी नगर येथील रवि कनोजिया यांचे घराजवळ समाजमंदीर बनविणे. | १०००००० |
| २८ | ४८ | उल्हासनगर–४ येथे मिलिंद नगर येथे भालेराव घरापासून ते रेल्वे लाईन पर्यंत नाला बनविणे. | ८००००० |
| २९ | २९ | उल्हासनगर–३ देवास मार्बल ते एस.इ.एस.शाळो क्र.३ पर्यंत एम–२५० ने रस्ता बांधणे. | १४९७२०० |
| ३० | २९ | उल्हासनगर–३ येथे सरस्वती नगर येथे साकव बनविणे. | ५००००० |
| ३१ | २९ | उल्हासनगर–३ सरस्वती नगर येथील कमला अपा.ची मागील बाजू ते साकव पर्यंत मार्गे गंगा जमुना अपार्टमेंट याठिकाणी नाली बनविणे. | ७८२५०० |
| ३२ | ४८ | उल्हासनगर–४ येथे मिलिंद नगर येथील भालेराव यांचे घरापासून ते बनसोडे यांचे घर व शौचालय जवळ एम–२५० रस्ता सि.सि.पायवाटा व नाला बनविणे. | १०००००० |
| ३३ | ५० | उल्हासनगर–४ येथील आर.जी.एस.शाळेमागे मए–२५० ने रस्ता व नाली बनविणे. | १०००००० |
| ३४ | ५५ | उल्हासनगर–४ येथील महेंद्र सिंग तायडे यांचे घर ते प्रेमनाथ गाडे यांचे घरापर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ९९८५०० |
| ३५ | ५५ | उल्हासनगर–४ रजनी राजन यांचे घर ते सिध्दार्थ सिन्हा मंडळ ग्राउंड पर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ९९९००० |
| ३६ | ५५ | उल्हासनगर–४ संध्या अपार्टमेंट ते महेंद्र सिंग तायडे यांचे घर याठिकाणी सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ३७ | ५५ | उल्हासनगर–४ येथील गुरुद्वारा ते रेल्वे लाईन ते श्री साई समर्थ अपार्टमेंट पर्यंत सि.सि.रोड व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ३८ | ५५ | उल्हासनगर–४ येथील मधूकर का.ऑप.सोसायटी ते गुरुद्वारा पर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ३९ | ५५ | उल्हसनगर–४ येथील अभ्यंकर बंगला ते मधूकर को.ऑप.सोसायटी पय्रंत सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ४० | ५५ | उल्हासनगर–४ येथील साइबाबा नगर ते गोडबोले यांचे घर ते पिंगळे यांचे घरापर्यंत नाला बनविणे. | ५००००० |
| ४१ | ५५ | उल्हासनगर–४ येथील पवार यांचे घर ते दिपक यांचे घर, साईबाबा नगर याठिकाणी सि.सि.पायवाटा, नाला व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ४२ | ५५ | उल्हासनगर–४ येथील आम्रपाली नगर, पंचशिल नगर, नायडू यांचे घर ते शिंदे यांचे घरापर्यंत नाला बनविणे. | ५००००० |
| ४३ | ६३ | उल्हासनगर–४ रामजी आंबेडकर नगर येथील डॉली लॉड्री ते ब्लॉक क्र. २९० पर्यंत एम–३५० ने रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ४४ | ६३ | उल्हासनगर–४ येथील संतोष सिंग वखार मार्गे अशोकवन याठिकाणी एम–३५० ने रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | ६४ | उल्हासनगर—४ येथील जिरा हाउस ते साईबाबा मंदीराची मागील बाजू याठिकाणी नाला बनविणे. | ५०००० |
| ४६ | ६४ | उल्हासनगर—४ नागसेन नगर येथील ब्लॉक क्र.ए—३३४ ते ए—३३२, ३३५,३३९ तसेच बॅरेक क्र.३४१ ते ३४३ ची मागील बाजू याठिकाणी सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ४७ | ६४ | उल्हासनगर—४ भरत नगर येथील मद्रासी पाडा ते लोखंडे यांचे घरापर्यंत सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ४८ | ६४ | उल्हासनगर—४ हनुमान मंदीर श्री.छत्रपती शिवाजी शाळा, मोरे यांचे घर, शिंदे यांचे घर याठिकाणी सि.सि.रोड व नाली बनविणे. | ९९८५०० |
| ४९ | ६० | उल्हासनगर—५ येथील श्रीराम नगर व लक्ष्मी नगर याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. | ५०००० |
| ५० | ६६ | उल्हासनगर—५ येथील हरीजन कॉटर्स येथे सि.सि.पायवाटा व नाली बांधणे. | ९९९००० |
| ५१ | ६८ | उल्हासनगर—५ पटेल नगर येथे एम—२५० ने रस्ता, सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | १०००००० |
| ५२ | ६८ | उल्हासनगर—५ महात्मा फुले नगर येथील ब्लॉक नं.७७५,७७७ जवळ सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९८००० |
| ५३ | ७० | उल्हासनगर—५ येथील विर तानाजी नगर येथे सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० |
| ५४ | ७१ | उल्हासनगर—५ विर तानाजी नगर येथे नाली व गटार बनविणे. | ९९९९०० |
| ५५ | ५ | उल्हासनगर—१ भिमनगर येथील भिमनगर गेट ते सावक, डॉ.गोपाल दवाखाना याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. | १०००००० |
| ५६ | १६ | उल्हासनगर—१ आनेद मॅथ्यू नगर (वाल्मिकी नगर) येथील माया रामबाबु निवास, राजविर चंद्रपाल, करोतिया निवास, आशिष सोधे निवास, विजय तेजी, निलू चांदीया, वाल्मिक मंदीर ते सोनपाल निवास, रुक्मीणी भोईर निवास बादल चांदलिया याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | १०००००० |
| ५७ | ६ | उल्हासनगर—१ व्हि.पी.नाईक कॉलनी, महात्मा फले नगर याठिकाणी सी.सी.एम—२५० ने रस्ता, सि.सि.पायवाटा व नाली बांधणे. | १०००००० |
| ५८ | १८ | उल्हासनगर—१ येथील मुकूंद नगर येथील प्रकाश वानखेडे ते विठ्ठल अपा. पर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बांधणे. | ५०००० |
| ५९ | १८ | उल्हासनगर—१ पाईपलाईन झोपडपट्टी येथील शिवसेना ऑफीसच्या मागे, शनिमंदीर परिसर याठिकाणी सि.सि.पायवाटा, सि.सि.एम—२५०, व नाली बांधणे. | ५०००० |
| ६० | २० | उल्हासनगर—१ हर्षवर्धन नगर व इंद्रा नगर येथील रेखा सपकाळे निवास, पार्वतीबाई चंदनशिवे, रमेश निवास, छाया आवारे निवास, माता मंदीराजवळ, रंजना सुरेश वाघमारे, शांताबाई पिसाळ यांचे घराजवळ, आशा भालेराव, शोभा जाधव, अनवर अहमद शेख, यांच्या घरासमोर चेकर्ड लादी, सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | १०००००० |
| ६१ | ३ | उल्हासनगर—१ शिवनेरी नगर येथील दशरथ गिरी, अनिल चव्हाण, मराठे निवास, अनंत सावंत, शंकर माने, नरेश सिंग, यांच्या घराजवळ सि.सि.पायवाटा, नाली व संरक्षण भिंत बांधणे. | ५०००० |
| ६२ | ३ | उल्हासनगर—१ तानाजी नगर येथील शाळा क्र.२३,२६ मागील परिसर, हिरामटण शॉप ते डॉ.सिंग दवाखाना, मुक्कांबिका परिसर याठिकाणी सि.सि.पायवाटा, नाली बांधणे. | ५०००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३ | ७ | उल्हासनगर–१ इंद्रा नगर झोपडपट्टी मध्ये एम–२५० रस्ता, पायवाटा, व नाल्या बनविणे. | ५०००००० |
| ६४ | ७ | उल्हासनगर–१ करोतिया नगर येथे सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ६५ | ७ | उल्हासनगर–१ करोतिया नगर येथे साकव व नाली बनविणे. | ३०००००० |
| ६६ | ७ | उल्हासनगर–१ गौतम नगर येथे सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ६७ | ७ | उल्हासनगर–१ येथील सेंच्युरी रेयॉन गेट ते गौतम नगर गेट पर्यंत एम–२५० ने रस्ता व नाली बनविणे. | १०००००० |
| ६८ | ९ | उल्हासनगर–३ येथील ब्राम्हणपाडा येथे समाजमंदीर बनविणे. | १०००००० |
| ६९ | ३२ | उल्हासनगर–३ मिलननगर सुभाषनगर भवानी नगर याठिकाणी नाली, सी.सी., पेव्हर ब्लॉक बनविणे. | १४००००० |
| ७० | ५३ | उल्हासनगर–४ सिध्दार्थ नगर येथे संरक्षण भिंत बनविणे. | १०००००० |
| ७१ | ५३ | उल्हासनगर–४ सिध्दार्थ नगर याठिकाणी सि.सि.पायवाटा, नाला व नाली बनविणे. | १०००००० |
| ७२ | ११ | उल्हासनगर–३ सावित्रिबाई फुले नगर गणपती मंदीर ते बागुल यांचे घरापर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ७३ | ११ | उल्हासनगर–३ इंदीराआवास नगर येथील लक्ष्मण यांचे घर ते स्मशान भुमी याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ७४ | ५२ | उल्हासनगर–४ साईनाथ कॉलनी बि.पी.मिस्त्रि यांचे घरापासून पाण्याच्या टाकीपर्यंत नाली बनविणे. | ५०००००० |
| ७५ | ५२ | उल्हासनगर–४ रामनगर येथे दत्ता यांचे घर ते रमेश मराठे यांचे घरापर्यंत नाला बनविणे. | ५०००००० |
| ७६ | ४७ | उल्हासनगर–४ भिमनगर येथे विकी गायत्री यांचे घरापासून ते नंदाबाई खोरे यांचे घरापर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ७७ | ४७ | उल्हासनगर–४ भिमकॉलनी येथे उध्दव कांबळे यांचे घरापासून ते प्रदीपदास घरापर्यंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या पाठीमागे सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ७८ | ४७ | उल्हासनगर–४ भिमकॉलनी येथे राजाराम सरदार घरापासून ते एकनाथ भोसले घरापर्यंत आणि सभोवतालचा परिसर याठिकाणी सि.सि.पायवाटा, सि.सि.पाय–या व नाली बनविणे. | ५०००००० |
| ७९ | ४७ | उल्हासनगर–४ भिमकॉलनी येथे बबलु यांचे घरामागून ते शंकर मिस्त्रि यांचे घरापर्यंत व सभोवतालचा परिसर याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ८० | ४७ | उल्हासनगर–४ जागृती कॉलनी येथील साईबाबा मंदीर पासून ते लोखंडे यांचे घरापर्यंत तसेच साईबाबा मंदीरपासून ते वाघ यांचे घरापर्यंत आणि सभोवतालचा परिसर याठिकाणी सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | ५०००००० |
| ८१ | ३२ | उल्हासनगर–३ गौतमवाडी येथे शाळा क्र.८ ते जवाहर सिनेमा पर्यंत एम–२५० ने रस्ता व नाली बनविणे व गौतमवाडी व महाराजा हॉल मागे पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | १५००००० |
| ८२ | ३९ | उल्हासनगर–३ वडार कॉलनी येथील सिंग एस.टी.डी. ते रामा गायकवाड घराच्या परिसरात पेव्हर ब्लॉक पायवाटा नाल्या बनविणे | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | ३९ | उल्हासनगर—३ संत ज्ञानेश्वर नगर येथील पंचशिल बौध्द विहार जवळील परिसरात पायवाटा व नाल्या बनविणे | १०००००० |
| ८४ | ४१ | ,शास्त्रीनगर येथील संतोषी माता मंदीर पर्यंत पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ५००००० |
| ८५ | ४१ | उल्हासनगर—३ शास्त्रीनगर धोबीघाट, बाल्कनजीबारी पाणी पुरवठा क्वार्टर येथे समाजमंदीर बनविणे. | ६००००० |
| ८६ | ४२ | उल्हासनगर—३ वॉर्ड क्र. ४२, महात्मा गाधी कॉलनी, सुभाष नगर कन्नन यांचे घर, तसेच रामा यांचे घराजवळ, सी. सी. पायवाटा, नाली व पेव्हर ब्लॉक बसविणे | ७००००० |
| ८७ | ३४ | उल्हासनगर—३ सतनाम कॉलनी राजू ॲसीड कंपनी ते चांद फर्निचर पर्यंत नाला, नाली एम—२५० सी.सी.पेव्हर ब्लॉकचे काम करणेबाबत. | ८००००० |
| ८८ | ३४ | उल्हासनगर—३ सतनाम कॉलनी हरीजन कॉलनी येथील नटराज ट्रान्सपोर्ट ते सतनाम कॉलनी कल्व्हर्ट पर्यंत नाली व फुटपाथ बनविणे. | १०००००० |
| ८९ | ३४ | उल्हासनगर—३ हरीजन कॉलनी येथील गिता कॉम्प्लेक्स ते भोलेनाथ कॉलनी पर्यंत नाला बनविणे. | ८००००० |
| ९० | ३४ | उल्हासनगर—३ हरिजन कॉलनी व सतनाम कॉलनी पासून शानदार अपार्टमेंट पर्यंत नाला बनविणे. | ७००००० |
| ९१ | ३४ | उल्हासनगर—३ हरिजन कॉलनी येथील हनिमुन कॉटेज ते गिता कॉम्प्लेक्स पर्यंत नाला बनविणे. | ८००००० |
| ९२ | ३४ | सतनाम कॉलनी येथील कामगार हॉस्पीटल कल्व्हर्ट ते संतराम यादव घरापर्यंत नाला बनविणे. | ५००००० |
| ९३ | १२ | कैलाशनगर येथील बुध्दविहाराच्या परिसरात पायवाटा, नाल्या व पेव्हरब्लॉकने काम करणे. | ५००००० |
| ९४ | ५४ | उल्हासनगर—३ वडोलगांव येथील प्रफुल्ल दुलभे ते केणे यांच्या घरापर्यंत व जयराम चव्हाण ते प्रजापती निवास अशोक ओंकार ते गजानन म्हात्रे इ. ठिकाणी पायवाटा, नाल्या व पेव्हरब्लॉकचे काम करणे. | १०००००० |
| ९५ | ४६ | उल्हासनगर—३ अयोध्यानगर येथील सोनावणे यांच्या घरापासून पठाण यांच्या घरापर्यंत पायवाटा व नाल्या, नाला बनविणे व कव्हर करणे. | ५००००० |
| ९६ | ४६ | उल्हासनगर—३ अयोध्या नगर शेख यांच्या घराचा परिसरात पायवाटा नाल्या बनविणे व कव्हर करणे. | ५००००० |
| ९७ | ४६ | उल्हासनगर—३ शिवाजीनगर येथील १० बैठकीचे शौचालयापासून मुख्य ररस्त्यापर्यंत पायवाटा व नाल्या पेव्हरब्लॉक बनविणे. | ५००००० |
| ९८ | १२,१३ | उल्हासनगर—३ महात्मा फुले नगर व कौशल नगर येथे गुप्ता किराणा स्टोर ते सलीम खान यांच्या घराच्या परिसरात पेव्हरब्लॉक नाल्या , सि.सि. बनविणे. | १०००००० |
| ९९ | ५६ | उल्हासनगर—४ येथील संभाजी चौक ते भिमचौक मार्गे राहूल नगर याठिकाणी एम—२५० ने रस्ता व नाली बनविणे. | १५००००० |
| १०० | ६५ | समता नगर १ व २ येथील नाल्याची संरक्षण भिंत व सि.सि.पॅसेज बनविणे. | ९९९९०० |
| १०१ | ४९ | प्रभाग क्र. ४९ , महादेव नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १०२ | ६६ | प्रभाग क्र. ६६ , कैलास नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | ८,००,०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | ७० | प्रभाग क्र. ७० , गणेश नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | ९,५०,०००/— |
| १०४ | ७५ | प्रभाग क्र. ७५ , आंबेडकर नगर व महात्मा फुले नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १०५ | ७६ | प्रभाग क्र. ७६ , गायकवाड पाडा येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | ९,४०,०००/— |
| १०६ | १८ | प्रभाग क्र. १८ , मुकुंद नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १०७ | ५१ | प्रभाग क्र. ५१ , आदर्श नगर, आयुष्यमान नगर, समतानगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १०८ | १८ | पाईप लाईन, पुलीस लाईन झोपडपट्टी येथे एम २५० ने रस्ता व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १०९ | ६ | महात्मा नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | ७,००,०००/— |
| ११० | ६ | डॉ. बाबासाहेब नगर, उत्तर भारतीय येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| १११ | ६ | संत रोहिदास नगर येथे सी.सी. पायवाटा व नाली बांधणे. | ५,००,०००/— |
| ११२ | ५७ | मिरा कांबळे हॉस्पीटल ते सुनंदा बळीराम हाउस, ओल्ड मटन मार्केट, उल्हासनगर—४ येथे एम२५० ने रस्ता बनविणे. | ९,९९,९००/— |
| ११३ | ५७ | एकता कॉलनी , गुरुकृपा कॉलनी, सुपाळे कॉलनी, विजय कॉलनी येथे एम २५० ने रस्ता बांधणे. | ९,९९,९००/— |
| ११४ | ६२ | भिम चौक ते इंदसिंग स्वामी, व्ही.बी. ससाणे यांच्या शिधावाटप दुकाना पर्यंत एम २५० ने रस्ता बांधणे. | ९,९९,९००/— |
| ११५ | ६३ | महात्मा फुले कॉलनी, रतन एम कांबळे हाउस ते मनपा सार्वजनिक शौचालयाशेजारी दळवी यांच्या घरापर्यंत नाला बांधणे. | ९,९९,९००/— |
| ११६ | ७२ | ब्लॉक ८८१ —८९० ते महेश्वरी हॉस्पीटल, कैलास कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक व नाली बांधणे. | १०,००,०००/— |
| | | **एकूण रु.** | १०,०२,८७,८२०/— |

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.३५ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका